बातमीपत्र

**पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर**

**माहिती कक्ष, दि २५ सप्टेंबर २०२४**

## फौजदार चावडी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ५७४/२०२४ भा न्या सं क ११८(२),३५२,३५१(३),३,(५)प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि २१/९/२०२४ रोजी १०.३० वा शुक्रवार पेठ सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि २४/०९/२०२४ रोजी २१.०८ |
| **फिर्यादीचे नाव** | : | भारती प्रकाश कांबळे,वय-४५ वर्षे,रा- ३०२,ढोर गल्ली शुक्रवार पेठ सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) प्रभाकर जयकुमार कुसुमकर २) अमर प्रभाकर कुसुमकर दोघे रा- शुक्रवार पेठ सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी यातील फिर्यादीचे मुन्सीपल प्लॉट नं ४५४/४५५/५५६ शुक्रवार पेठ येथे यातील आरोपीने पत्राशेड मारून अतिक्रमण केले असल्याने फिर्यादी व तिचे पती प्रकाश मुलगा किरण ,दिपक,पुतण्या दिलीप व त्याची पत्नी वंदना चुलत सून माधवी व इतर असे मिळून सदर प्लॉट वर गेले असता आरोपी १ याने शिवीगाळ केली व तुम्हाला मस्ती आली आहे का तुम्हाला बघुन घेतो तुमचा येथे यायचा काय संबंध आहे असे म्हणत फिर्यादी व फिर्यादीचा मुलगा किरण याला आरोपीच्या हातातील लाकडी फळीने मारहाण केली तसेच आरोपी क्र २ यांने लाकडी बॅटने चुलत सुन वंदना व नातु शुभम यांना मारहाण केल्याने त्यांना मुक्का मार लागला आहे.म्हणून. तपास:- पोह/८३७/पवार- ८१०८८८०५२७ |

## एमआयडीसी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ६७४/२०२४ भा न्या सं क २८१,१२५(ब),सह मोवाका १८४,१३४(ब),१७७ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि २३/०९/२०२४ रोजी १३.४५ वा. हकिम हॉटेल समोर सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि २४/०९/२०२४ रोजी ०२.१० वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | साकिब रफिक बागवान,वय-२३ वर्षे,रा- गंगाई केकडे नगर मुळेगाव क्रॉस रोड सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | अज्ञात वाहन चालक |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी यातील फिर्यादीच्या ताब्यातील मो.सायकल क्र एमएच १३ बी सी ३१०१ वरून मोबाईल दुरूस्ती करण्यासाठी जात असताना नमुद ठिकाणी रोडवर आले असता समोरील टाटा इंन्ट्रा वाहन क्र एमएच २५ ए जे ४१४० चे अज्ञात चालकाने त्यांचे ताब्यातील वाहनाचा निष्काळजीपणाने ब्रेक मारल्याने फिर्यादीची मो.सायकल सदर वाहनाचे मागील बाजूस जावून धडकल्याने त्यात फिर्यादीचे डाव्या पायाचे मांडीचे हाड व पायाच्या नडगीचे हाडास मार लागल्यामुळे फिर्यादीस जबर दुखापत झाली आहे.म्हणून. तपास:- पोह/५१२/गायकवाड-९६२३३३०२२२ |

# विजापूर नाका पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ४३०/२०२४ भा न्या सं क १०९,११५(२),३५२,३५१(२),३(५) प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि २३/०९/२०२४ रोजी १२.३० वा. नुराणी मस्जिद जुना विजापूर नाका सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि २४/०९/२०२४ रोजी २०.५१ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | तुषार कैलास गायकवाड,वय-२० वर्षे,रा-से.फ्रि.कॉलनी नं ०३ सलगरवस्ती पोलीस ठाणे शेजारी सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) अविनाश मदनावाले २) राजेश मदनावाले ३) विशाल जाधव ४) एक अनोळखी इसम |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, दि २३/०९/२०२४ रोजी १२.३० वा. नुराणी मस्जिद जवळ स्पर्श फायनान्स कंपनीकडून मिळालेल्या ब्लॅक लिस्टवरील बजाज कंपनीची पल्सर मो.सायकल क्र एमएच १३ ई डी ९२८६ ही फिर्यादी ताब्यात घेत असताना आरोपी क्र १ ते ४ यांनी मिळून फिर्यादी व फिर्यादीचे मित्र लक्ष्मण जाधव,समर्थ गायकवाड,विजय जाधव व टिम लिडर आकाश धुमाळ यांना शिवीगाळ करून हाताने व लाथाबुक्यांनी मारहाण केली आहे तसेच आरोपी क्र १ याने बाजूला पडलेला खोऱ्या घेवून मित्र लक्ष्मण जाधव याला थांब तुला खल्लास करतो असे म्हणून जिवे मारण्याच्या उद्देशाने डोक्यात व छातीत लोखंडी खोऱ्याने मारून जखमी केले आहे तसेच लक्ष्मण जाधव हा मारहाणीत जखमी होवून खाली पडला असता अरोपी क्र १ व २ यांनी त्यास परत जाणीवपुर्वक जीवे मारण्याच्या उद्देशाने फरशीने डोकीत मारहाण केली आहे.म्हणून. तपासः- सपोनि गायकवाड-**९९७००३३८४०** |